# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

मा.स्थायी समिती सभा क्रमांक - १० दिनांक २७-१२-२००४.

विषय क्रमांक - १
स्थायी समिती ठराव क्रमांक - १ दिनांक -२७-१२-२००४.

प्रस्तावाचा विषय - मुंबई प्रांतिक महानगर पालिका अधिनियम १९४९चे कलम २१(१) चे तरतुदी नुसार मा.स्थायी समिती सभापती पदावर निवड करणे.
ठराव - मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१(१) नुसार मा.स्थायी समिती सदस्या मधून स्थायी समिती सभापती पदी निवड करणे कामी बोलावण्यांत आल्या प्रमाणे मा.स्थायी समितीची सभा सोमवार दिनांक २७/१२/२००४ रोजी दुपारी १=००वाजता मा.महानगरपालिका सभागृहामध्ये भरली असता खालील प्रमाणे स्थायी समिती सदस्य उपस्थित होते.

१ ) मा.श्री.गंधे मिलिंद सदाशिव
२ ) मा.श्री.कुलकर्णी नरेंद्र सच्चिदानंद
३ ) मा.श्री.साठे मनेष दशरथ
४ ) मा.श्री.बोरा किशोरकुमार हिंमतलाल
५ ) मा श्रीमती.सहानी सुनिता राकेश
६ ) मा.श्री.चोपडा संजय फुलचंद
७ ) मा.श्री.चव्हाण दिप नारायण
८ ) मा.श्री.दातरंगे अर्जून भाऊसाहेब
९ ) मा.श्री.जाधव कृष्णा दत्तात्रय
१० ) मा.श्री.कोतकर भानुदास एकनाथ
११ ) मा.श्री.जगताप नितीन विलास
१२ ) मा.श्री.पवार नामदेव शांताराम
१३ ) मा.श्री.खैरे दिपक साहेबराव
१४ ) मा.श्री.उडाणशिवे भाऊसाहेब भिमाजी
१५ ) मा.श्री.पाऊलबुध्दे विनीत नाथ
१६ ) मा.श्रीमती सय्यद वर्षा अरिफ

सभेकरिता आवश्यक गणपूर्ती झाल्याने सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यांत आली.सभेच्या सुरुवातीस उपायुक्त साहेब यांना मावळतेसभापती ॲड.अभय आगरकर हे दिनांक १/१२/२००४ रोजी निवृत्त झाल्यामुळे आजच्या सभेचे कामकाजाकरीता पिठासीन अधिकारी म्हणून समिती सदस्या मधून एका सदस्याची निवड करणे आवश्यक असल्याने सदस्यांनी पिठासीन अधिकारी म्हणून नाव सुचविणे बाबत आवाहन केले असता श्री.अर्जूनराव दातरंगे हे सभेचे पिठासीन अधिकारी असावेत अशा

बाबत मा.श्री.जाधव कृ.द.यांनी सूचना मांडली त्यांस मा.श्री.पवार ना.शां. सदस्य स्थायी समिती यांनी अनुमोदन दिले त्यास सर्व सभासदांनी संम्मती दिल्याने पिठासीन अधिकारी म्हणून श्री.दातरंगे अर्जून भाऊसाहेब यांची निवड करण्यांत आली.त्याच्या अध्यक्षतेखाली निवडणुकीची प्रक्रिया सुरु करण्यांत आली.

दुपारी १=१० ते १=२५ वाजे पर्यत स्थायी समिती सभापती पदासाठी नामनिर्देशन पत्र दाखल करणे करिता वेळ देण्यांत आली असता मुदतीत खालील प्रमाणे चार उमेदवारी अर्ज प्राप्त झाले.

१ ) श्री.चोपडा संजय फुलचंद
सुचक - श्री.दातरंगे अर्जून भाऊसाहेब
२ ) श्री.चव्हाण दिप नारायण
सुचक - श्रीमती सहानी सुनिता राकेश
३ ) श्री.साठे मनेष दशरथ
सुचक - श्री.बोरा किशोरकुमार हिंमतलाल
४ ) श्री.पवार नामदेव शांताराम
सुचक - श्री.खैरे दिपक साहेबराव

उपरोक्त आलेल्या चार नामनिर्देशन पत्राची छाननी केली असता सर्व उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र विधीग्राहय असल्याने ते स्विकारण्यांत आल्याचे घोषित करण्यांत आले.

ज्या उमेदवारास आपली उमेदवारी मागे घ्यावयाची आहे त्या करिता दुपारी १=३० ते २=०० वाजेपर्यत मुदत देण्यांत आली त्यानंतर पिठासीन अधिकारी यांनी अर्ज मागे घेण्याची मुदत दुपारी २=१५ वाजे पर्यत वाढवून दिली.त्यानंतर पुन्हा पिठासीन अधिकारी यांनी दुपारी २=३० वाजे पर्यत वेळ वाढवून दिली त्यानंतर पुन्हा दुपारी २=४० वाजे पर्यत वेळ वाढवून देण्यांत आली.

उपरोक्त वेळे मध्ये खालील मा.स्थायी समिती सदस्य यांनी आपली उमेदवारी मागे घेत असल्या बाबतचे अर्ज पिठासीन अधिकारी यांचे कडे सादर केले.

१ ) श्री.चोपडा संजय फुलचंद
२ ) श्री.चव्हाण दिप नारायण
३ ) श्री.पवार नामदेव शांताराम

सभापती पदासाठी एकच उमेदवार निवडून द्यावयाचा असल्यामुळे व श्री.साठे मनेष दशरथ यांचा एकच उमेदवारी अर्ज शिल्लक राहिल्यामुळे श्री.साठे मनेष दशरथ हे रितसर स्थायी समितीचे सभापती म्हणून निवडून आल्याचे पिठासीन अधिकारी यांनी जाहीर केले.

पिठासीन

अधिकारी,

मा.स्थायी समिती सभापती निवडणुक २००४
अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

मा.स्थायी समिती सभा क्रमांक - ११ दिनांक ३१-१-२००५.

---

विषय क्रमांक - १
स्थायी समिती ठराव क्रमांक - १ दिनांक -३१-१-२००५

**प्रस्तावाचा विषय** - अहमदनगर महानगरपालिकेचे प्रशासकीय वॉर्ड क्रमांक तीन करिता संत गाडगे बाबा स्वच्छता अभियान अंतर्गत मिळालेले महाराष्ट्र शासनाचे पंडित जवाहरलाल नेहरु स्वच्छता योजनेचे पारितोषिक रक्कम रुपये पांच लाखाचे विनियोगा बाबत ऑफिस रिपोर्ट आदेशार्थ.

**ठराव -** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रशासकीय वॉर्ड क्रमांक तीन करिता संत गाडगे बाबा स्वच्छता अभियान अंतर्गत मिळालेले महाराष्ट्र शासनाचे पंडित जवाहरलाल नेहरु स्वच्छता योजनेचे पारितोषिक रक्कम रुपये पांच लाखाचे विनियोगा बाबत कार्यालयाने सादर केलेल्या प्रस्तावावर सभे मध्ये झालेल्या सविस्तर चर्चे नुसार पुढील प्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

अहमदनगर महानगरपालिकेचे प्रशासकीय वॉर्ड क्रमांक तीन ( प्रभाग क्रमांक १६ ते २१) करिता मिळालेले पंडित जवाहरलाल नेहरु स्वच्छता योजनेचे पारितोषिक रुपये पांच लाख रक्कमेचा विनियोग शासन आदेशातील निर्देशा प्रमाणे सदरचे प्रभाग क्रमांक १६ ते २१ चे नगर सेवक यांनी दिलेल्या सूचने प्रमाणे वॉर्ड मध्ये सम प्रमाणात खर्च करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे

सुचक - मा.श्री.जाधव कृ.द.
अनुमोदक - मा.श्री.कुलकर्णी न.स.
ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

मा.स्थायी समिती सभा क्रमांक - १३ दिनांक २२-२-२००४.

---

विषय क्रमांक - १
स्थायी समिती ठराव क्रमांक - १ दिनांक -२२-२-२००४.

प्रस्तावाचा विषय - मा.स्थायी समिती सभा दिनांक ३१/१/२००४ व दि.३१/१/२००४ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

मा.स्थायी समिती सभा दिनांक २९/११/२००४ व दि.३१/१/२००५ चे सभेचे कार्यवृत्त कायम करणे चा विषया वरील चर्चा.

१) मा.श्री.चव्हाण दि.ना. - मा.स्थायी समिती सभा दिनांक २९/११/२००४ मधील विषय क्रमांक दोन व तीन तसेच सदर सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस विरोध नोंदवावा .विषय क्रमांक चारचे मंजूर ठरावा नुसार कार्यवाही करावी.

२) मा.श्री.कुलकर्णी न.स.- मा.स्थायी समिती सभा दिनांक २९/११/२००४ चे सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस विरोध नोंदवावा.

३) मा.श्री.जाधव कृ.द.व मा.श्री.चव्हाण दि.ना.- जलविहार चालविण्यांस दिलेली मुदत संपण्या पूर्वी मुदत वाढ का देण्यांत आली .अध्यक्ष जिल्हा माजी सैनिक संघ हे पोहणारा कडून रुपये दहा ऐवजी पंधरा वसूल करतात,मासिक पासचे रुपये १५०/- ऐवजी रुपये २५०/- घेतात. त्यांनी जलविहार परिसरातील झाडे तोडली आहेत.त्यांचे वर कारवाई करावे त्यांनी अटी शर्तीचा भंग केल्याने त्यांच्या वरील कारवाई बाबत रिपोर्ट मा.स्थायी समिती पुढे ठेवण्यांत यावा.

४) मा.श्री.गंधे मि.स.- जलविहार तलावाचे दोन भिंतीचे बांधकाम केले म्हणजे इमारतीचे नूतणीकरण झाल्याचे समजावे का त्यांनी अटी शर्तीचा भंग केलेल्या आहे त्यांचे वर कारवाई करणे बाबत रिपोर्ट मा.स्थायी समिती पुढे ठेवण्यांत यावा.

ठराव - मा.स्थायी समिती सभा दिनांक २९/११/२००४ व दिनांक ३१/१/२००५ चे सभेचे कार्यवृत्त कायम करणे विषयी सभे मध्ये झालेल्या सविस्तर चर्चे नुसार पुढील प्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

मा.स्थायी समिती सभा दिनांक २९/११/२००४ चे सभे मध्ये पारीत झालेल्या ठराव क्रमांक सात मधील अहमदनगर महानगर पालिकेचा जलविहार तलाव चालविण्यांस दिलेल्या अध्यक्ष जिल्हा माजी सैनिक संघ यांनी करारनाम्यातील अटी शर्तीचा भंग केल्याचे आढळल्याने त्यांचेवर कारवाई करणे बाबत संबंधीत विभागाने सविस्तर रिपोर्ट तयार करुन तो मा.स्थायी समिती पुढे पुढील कारवाई साठी सादर करण्यांत यावा.

या प्रमाणे सदर ठरावा मध्ये दुरुस्ती ( उल्लेख) करुन मा.स्थायी समिती सभा दिनांक २९/११/२००४ व दिनांक ३१/१/२००५ चे सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

मा.स्थायी समिती सभा दिनांक २९/११/२००४ चे सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मा.श्री.चव्हाण दि.ना.व मा.श्री.कुलकर्णी न.स. सदस्य स्थायी समिती यांचा विरोध.

सुचक - मा.श्री.पाऊलबुध्दे वि.ना.

अनुमोदक - मा.श्री.बोरा कि.हि.

ठराव बहुमताने मंजूर.

सभापती,

स्थायी समिती,

अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

मा.स्थायी समिती सभा क्रमांक - १३ दिनांक २२-२-२००४.

विषय क्रमांक - २
स्थायी समिती ठराव क्रमांक - २ दिनांक -२२-२-२००४.

प्रस्तावाचा विषय - राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय नागपूर येथिल स्टेशन ऑफिसर इन्स्क्टर्स पाठयक्रमाच्या दिनांक ३/१/२००५ ते २४/६/२००५ अखेर कालावधीत होणा-या प्रशिक्षणास मुख्या अग्निशामक अधिकारी श्री.शंकर मिसाळ यांना पाठविणे बाबत ऑफिस रिपोर्ट अखेर मंजूरीस्तव सादर.

राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय येथील स्टेशन ऑफिसर इन्स्ट्रक्टर्स चे प्रशिक्षणास मुख्य अग्निशामक अधिकारी श्री.शंकर मिसाळ यांना पाठविणे बाबत विषया वरील चर्चा

मा.श्री.गंधे मि.स.- मुख्य अग्निशामक अधिकारी यांचे अनुपस्थितीत पर्यायी व्यवस्था केली आहे काय?

मा.श्री.देशमुख साहेब,उपायुक्त साहेब - उपमुख्य अग्निशामक अधिकारी काम पहात आहेत.

ठराव - राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय नागपूर येथील स्टेशन ऑफिसर इन्स्ट्रक्टर्स पाठय क्रमाच्या दिनांक ३/१/२००५ ते दिनांक २४/६/२००५ अखेर कालावधीत होणा-या प्रशिक्षणास मुख्य अग्निशामक अधिकारी श्री.शंकर मिसाळ यांना पाठविणे बाबत ऑफिस रिपोर्टास अखेर मंजूरी देण्यांत येत आहे.

नियमा नुसार कार्यवाही करावी.

सुचक - मा.श्री.चव्हाण दि.ना.
अनुमोदक - मा.श्री.गंधे मि.स.
ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

मा.स्थायी समिती सभा क्रमांक - १३ दिनांक २२-२-२००४.

---

विषय क्रमांक - ३
स्थायी समिती ठराव क्रमांक -३ दिनांक -२२-२-२००४.

प्रस्तावाचा विषय - अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या ना दुरुस्त विधंन विहिरी दुरुस्त करणे कामी रक्कम रुपये पाच लाखाचे वाढीव खर्चास तसेच सदर विधंन विहिरी दुरुस्तीचे काम जाहिर निविदा मागवून करणेस मंजूरी मिळणे विषयी ऑफिस रिपोर्ट ओदशार्थ.
अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या विधंन विहिरी दुरुस्त करणे बाबतचे विषयावर झालेली चर्चा.
मा.श्री.जाधव कृ.द.- विधंन विहिरी दुरुस्ती कामी मंजूर केलेली पांच लाखाची तरतूद तेवढीच ठेवण्यांत यावी वाढीव देण्यांत येऊ नये.३१ मार्च २००५ अखेर पर्यत मंजूरी द्यावी.
मा.श्री.पाऊलबुध्दे वि.न.- विधंन विहिरी दुरुस्त केल्या नंतर काम झाल्या बद्दल संबंधीत नगर सेवकाचा अभिप्राय घेणेत यावा.पुढील वर्षा साठी जाहिर निविदा मागवाव्यात.

ठराव - अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या नादुरुस्त विंधन विहिरी दुरुस्त करणे कामी जाहिर निविदा मागविण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. दिनांक ३१ मार्च २००५ अखेर पर्यत विधंन विहिरी दुरुस्तीचे काम सध्याचे मंजूर निविदा धारक यांचे कडून करुन घेण्यांत यावे.

तसेच या पुढे विधंन विहिरी दुरुस्ती कामी मा.उपायुक्त साहेब ( सा ) यांची प्रथम मंजूरी घेण्यांत यावी व विधंन विहिरी दुरुस्त केल्या नंतर संबंधीत मा.नगरसेवक यांचा त्या बाबत अभिप्राय घेण्यांत यावा.

नियमा नुसार कार्यवाही करण्यांत यावी.
सुचक - मा.श्री.पाऊलबुध्दे वि.ना.
अनुमोदक - मा.श्री.बोरा कि.हि.
ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,

स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

मा.स्थायी समिती सभा क्रमांक - १३ दिनांक २२-२-२००४.

---

विषय क्रमांक - ४

स्थायी समिती ठराव क्रमांक -४ दिनांक -२२-२-२००४.

प्रस्तावाचा विषय -अहमदनगर महानगरपालिकेचे मा.पदाधिकारी व अधिकारी यांना प्रशासकीय कार्यालयीन कामकाजा साठी स्वताःची खाजगी वाहने वापरण्यांस परवानगी देऊन त्या बदल्यात त्यांना खर्चाची प्रतिपूर्ती देणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट ओदशार्थ.

सदरचे वरील विषयावर सभेमध्ये झालेली चर्चा.

१) मा.श्री.जाधव कृ.द.- प्रतिपुर्ती देणे कामी एवढा खर्च करावयाची आवश्यकता नाही ज्यांना वाहने वापरण्यांस द्यावयाची आहेत त्याची व्यवस्था मा.आयुक्त साहेबांनी करावी.अहमदनगर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती बिकट असल्याने मा.महापौर व मा.आयुक्त साहेब यांनाच फक्त वाहने वापरण्यांस द्यावीत इतर अधिकारी पदाधिकारी यांना वाहने वापरण्यांस देणेस आमचा विरोध नोंदवावा.

२) मा.श्री.पवार ना.शां.- आमचा सर्व विरोधी सदस्यांचा विरोध नोंदवावा.

३) मा.श्री.चव्हाण दि.ना.- हा शासन निर्णय फक्त अधिका-या साठी आहे. पदाधिकारी यांना तो लागू होत नाही.सदर प्रस्ताव मंजूर केल्यास त्यास माझा विरोध नोंदवावा वाहने वापरण्यांस देणे बाबत कार्यालयाने निर्णय घ्यावा.

४) मा.श्री.चोपडा सं.फु.- हा प्रस्ताव मा.शासनाकडे मार्गदर्शना साठी पाठवावा त्यांचे मार्गदर्शन येऊ पावेतो मा.पदाधिकारी यांना वाहने व इंधन महानगरपालिकिने पुरवावे शासनाची मंजूरी न मिळाल्यास त्या बाबतची वसुली संबंधीत पदाधिकारी यांचे कडून करावी.

५) मा.सौ.सहानी सु.रा.- महीला व बालकल्याण समितीला वाहन द्यावे.

६) मा.श्री.पाऊलबुध्दे वि.ना., व मा.श्री.बोरा कि.ही.- महानगर पालिकेने नविन वाहने खरेदी करावीत.

७) मा.सभापती साहेब - शासन निर्णया नुसार अधिकारी व पदाधिकारी यांना प्रतिपूर्ती देता येईल काय? याचे मार्गदर्शन मा.शासना कडून मागवावे नियमात तरतूद पाहून जे पात्र आहेत त्याना वाहने देणे बाबत प्रशासनाने कार्यवाही करावी

ठराव - अहमदनगर महानगरपालिकेचे मा.पदाधिकारी व अधिकारी यांना प्रशासकीय कार्यालयीन काम काजासाठी स्वताःची खाजगी वाहने वापरण्यांस परवानगी देऊन त्या बदल्यात त्यांना खर्चाची प्रतिपूर्ती देणे विषयी मा.शासनाचा अभिप्राय मागवून त्या प्रमाणे कारवाई करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

तसेच नियमामधील तरतुदी पाहून जे पात्र अधिकारी पदाधिकारी आहेत त्यांना वाहने वापरण्यांस देणे बाबत प्रशासनाने कारवाई करावी.

मा.महापौर मा.आयुक्त साहेब यांचे व्यतिरिक्त इतर अधिकारी पदाधिकारी यांना महानगरपालिकेची आर्थिक स्थिती बिकट असल्याने वाहेने वापरण्यास देणेस मा.श्री.जाधव कृ.द.मा.,श्री.पवार ना.शां.,मा.श्री.खैरे दि.सा.,मा.श्री.जगताप नि.वि.,मा.सौ.सय्यद वर्षा अरिफ,मा.श्री.उडाणशिवे भा.भि.सदस्य स्थायी समिती यांचा विरोध.

नियमानुसार कार्यवाही करावी.

सुचक - मा.श्री.बोरा कि.हि.

अनुमोदक - मा.श्री.पाऊलबुध्दे वि.ना.

ठराव बहुमताने मंजूर.

सभापती,<br>
स्थायी समिती,<br>
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

मा.स्थायी समिती सभा क्रमांक - १४ दिनांक २९-३-२००५.

---

विषय क्रमांक - १

स्थायी समिती ठराव क्रमांक -१ दिनांक -२९-३-२००५

प्रस्तावाचा विषय - मा.स्थायी समिती सभा दिनांक ७/२/२००५ व दि.२२/२/२००५ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

प्रस्तावाचा मजकूर - मागील सभा दिनांक ७/२/२००५ व दिनांक २२/२/२००५ रोजी झालेल्या मा.स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यासाठी मा.स्थायी समिती पुढे ठेविले.

मा.स्थायी समिती सभा दिनांक ७/२/२००५ व दिनांक २२/३/२००५ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे या विषया वर सभेमध्ये झालेली चर्चा.

१ ) मा.श्री.गंधे मि.स.- जलविहारा संबधी कायम ठराव झाला तो चावण्यांत यावा.त्याप्रमाणे मा.स्थायी समिती सभा दिनांक २२/२/२००५ रोजी पारीत झालेला ठराव क्रमांक १ सभे मध्ये वाचून दाखविण्यांत आला.

२ ) मा.श्री.गंधे मि.स. - जलविहार चालविण्यांस देणेची मुदत संपण्या अगोदर मुदत वाढ दिली सभा दिनांक २२/२/२००५ चे जलविहारा संबंधी झालेल्या ठरावावर काय?कारवाई केली.

३ ) मा.सभापती साहेब - जलविहार तलावाचे परिसरातील झाडे तोडली त्यावर काय ?कारवाई केली.

४ ) मा.उपायुक्त साहेब ( सा ) जादा फि वसुली बाबत पुरावे दिलेले नाहीत.सदर प्रकरणी अहवाल प्राप्त झाले नंतर कारवाई करण्यांत येईल.

ठराव - मा.स्थायी समिती सभा दिनांक ७/२/२००५ व दिनांक २२/२/२००५ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक - मा.श्री.

अनुमोदक -

ठराव सर्वानुमते मंजूर.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

मा.स्थायी समिती सभा क्रमांक - १४ दिनांक २९-३-२००५.

---

विषय क्रमांक -२

स्थायी समिती ठराव क्रमांक -२ दिनांक -२९-३-२००५

प्रस्तावाचा विषय - अहमदनगर महानगरपालिकेची पिंपळगाव माळवी ते जुन्या टाकी पर्यतची १५ इंची पाईप लाईन पिंपळ गावच्या बाजूने अडीच ते तीन कि.मी.अंतरा पर्यत काढून स्टोअर विभागा कडे जमा करणेस व त्या कामी येणारे अंदाजे रुपये २५०००/- चे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट ओदशार्थ.

**प्रस्तावाचा मजकूर** - विनंती पूर्वक रिपोर्ट करण्यांत येतो कि,पिंपळगांव माळवी ते जुनी टाकी ही १५'' सी.आय.पाईपलाईन असून अंदाजे ७// मं ८ कि.मी.लांबीची आहे. सदरच्या पाईपलाईन मध्ये अंदाजे १ कि.मी. लांबीचे सिंमेटचे पाईप आहे. सदरची पाईपलाईन ही जुन्या पिंपळगांव रस्त्याच्या कडेने टाकलेली आहे. परंतु आता काही ठिकाणी पाईपलाईन वर घरे किंवा रोजी केलेली आहे.

सदरची पाईपलाईन हि पिंपळगांव माळवीच्या बाजूने चोरीला चाललेली असून याबाबत पोलिसात रितसर फिर्याद दाखल केलेली आहे. सदरची पाईपलाईन ही पिंपळगांव माळवीच्या बाजूने अंदाजे २// ते ३ कि.मी.अंतरापर्यत काढून घेतल्यास चोरीचा प्रश्न उदभवणार नाही.त्यादृष्टीने मनपाच्या मालकीचे जे.सी.बी.मशीन सलग सात आठ दिवस मिळाल्यास सदरचे पाईप काढून मनपा स्टोअरला मनपाच्या दोन डंपरच्या सहाय्याने जमा करता येतील व भविष्यात देखभाल दुरुस्तीच्या अगर एखाद्या ठिकाणी पाईपलाईन टाकण्यास कामात येऊ शकतील असे वाटते.मनपाच्या जे.सी.बी.मशीन व दोन डंपर सोबतच काढलेले पाईप उचलणे व परत जागेवर व्यवस्थित ठेवणे करिता क्रेन हि लागेल सदरची क्रेन ही भाडयाने तासावर घ्यावी लागेल. त्यासाठी अंदाजे रोज चार तास वार करीत धरल्यास आठ दिवसा करिता एकूण अंदाजे ३२ तासाचा वापर होण्याची शक्यता आहे. त्यासाठी अंदाजे खर्च रुपये २०,८००/- इतका अपेक्षीत आहे.

तसेच तदनुषंनिक खर्च धरल्यास पाईपलाईन काढण्यास्तव अंदाजे खर्च रु.२५०००/- इतका अपेक्षीत आहे.तरी पिंपळगांव माळवी ते जुनी टाकी येथ पर्यतची १५'' पाईप लाईन पिंपळगांवच्या बाजूने २// ते ३ कि.मी.अंतरापर्यत काढून मनपा स्टोअरला जमा करणेस व त्या कामी येणारे अंदाजे खर्चास मान्यतेस्तव तथापी पुढील योग्य त्या आदेशार्थ सादर.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

अहमदनगर महानगरपालिकेची पिंपळगांव माळवी ते जुन्या टाकी पर्यंतची १५ इंची पाईप लाईन पिंपळगांव च्या बाजूने अडीच ते तीन कि.मी. अंतरा पर्यत काढून स्टोअर विभगा कडे जमा करणेस व त्या कामी येणारे रुपये २५०००/- चे खर्चास मंजूरी मिळणे बाबत विषयावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.श्री.गंधे मि.स. - सदर विषयी ऑडीटर यांचे मत काय ? आहे.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट वरील ऑडीटर यांचे मत चाचून दाखविण्यांत आले.
मनपाचे आर्थिक नुकसान होणार नसल्यास पाईपलाईन काढून मशिनरी सह लिलाव करावा.
मा.श्री.कोतकर भा.ए. - एकूण किती पाईप लाईन आहे त्या पैकी,काढावयाची पाईप लाईन किती आहे.
मा.उपायुक्त ( सा ) - पाईपलाईन पिंपळगांव चे बाजूने मनपा हद्यीपर्यत काढणेत येणार आहे.
श्री.निकम इंजि. - साडेसात ते आठ किलो मीटर पाईपलाईन आहे त्या पैकी,पिंपळगांवचे बाजूने मनपा हद्यी पर्यत ( तपोवन पर्यत ) पाईप लाईन काढावयाची आहे.
मा.श्री गंधे मि.स.- पाईपलाईन काढतांना किती नुकसान होणार आहे.
श्री निकम इंजि. - १५ ते २०% पर्यत नुकसान होऊ शकेल.
मा.श्री.कोतकर भा.ए. - पाईप लाईन काढत असतांना जादा नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी.
मा.श्री.जाधव कृ.द.- पूर्वी डोगंरगण नाल्याचे पाणी तलावात सोडले जात होते आता तसे होत नाही तसे केल्यास तेथे सिकारा चालतिा येईल.
**ठराव** - अहमदनगर महानगरपालिकेची पिंपळगांव माळवी ते जुन्या टाकी पर्यंतची १५ इंची पाईप लाईन पिंपळगांवच्या बाजूने अडीच ते तीन कि.मी.अंतरा पर्यत काढून स्टोअर विभागा कडे जमा करणेस व त्या कामी येणारे अंदाजे रुपये २५०००/- ( रुपये पंचवीस हजार फक्त ) चे खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे.

तसेच महानगरपालिका हद्यीमधील अस्तित्वात असलेल्या पाईपलाईन वापरा बाबत कारवाई करण्यांत यावी.

नियमानुसार कार्यवाही करण्यांत यावी.

सूचक -

अनुमोदक -

ठराव सर्वानुमते मंजूर.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

मा.स्थायी समिती सभा क्रमांक - १४ दिनांक २९-३-२००५.

विषय क्रमांक -३

स्थायी समिती ठराव क्रमांक -३ दिनांक -२९-३-२००५

प्रस्तावाचा विषय - अहमदनगर महानगरपालिकेचे सन २००३- २००४ सालचे रिव्हीजनचे काम केलेल्या कर्मचा-यांना मानधन अदा करणे बाबत ऑफिस रिपोर्ट आदेशाार्थ.

प्रस्तावाचा मजकूर - श्री.टी.एस. पुंड व इतर २७० रिव्हीजनमध्ये काम करणारे कर्मचारी यांनी त्यांचे दिनांक २३/६/०३ चे रिव्हीजन जादा केलेल्या कामाचा मोबदला मिळावा म्हणून केलेल्या अर्जावरुन ठेवण्यांत आलेल्या रिपोर्टावर तत्कालीन मा.उपायुक्त साहेब यांनी मान्यता देणे योग्य असा शेरा मारुन सदरचे प्रकरण मा.आयुक्त साहेब यांचे समोर ठेवले असा शेरा दिला.

सदरच्या विषयावर दिनांक २०/७/०४ रोजीच्या अहमदनगर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये चर्चा घडून आली. सदर विषयावर मा.सर्वसाधारण सभेत साधक बाधक चर्चा होवून रिव्हीजन करणा-या कर्मचा-यांना मानधन देण्याबाबत अर्थ संकल्पात निधीची तरतूद केलेली असल्याने सदर बाबत कर्मचा-यांना मानधन देणे बाबत आयुक्त साहेबांनी कार्यवाही करावी असा संकेत सभेने दिले आहेत.

तरी सोबतच तक्त्यांप्रमाणे मानधन अदा करणे करीता येणा-या खर्चास मंजूरी मिळावी हि विनंती.

सादर,

मा.आयुक्त साहेब यांनी या पूर्वी रु.१४लाख ९६ हजार इतके रक्कमेस मा.मनपा सर्वसाधारण सभेपुढे मान्यतेंसाठी ठेवणे बाबत सुचीत केलेले होते. तथापी रिव्हीजन विभाग प्रमुख याचे कडील प्रस्तावा प्रमाणे रक्कम रुपये १४,९६,०००/- प्रमाणे अदा करावयाची झालेस सन २००४ -२००५ चे वार्षिक अंदाज पत्रकीय तरतूद रक्कम रुपये १०,००,०००/- इतकी मंजूर करणेस आलेली आहे.

सबब जादा रक्कम रुपये ४,४९,०००/- खर्चास जादा येत असल्यामुळे महा.नपा लेखा संहिता १९७१ मधील नियम नं.२८,२९,९३० प्रमाणे पुर्ननियोजन अंदाज पत्रकात तरतुद दुरुस्त करावी लागेल सबब आदेशार्थ.

मा. महानगरपालिका विशेष सभ ठराव क्र.१ दिनांक ३१/३/२००४ अन्वये सन २००४-२००५ चे बाबवार जमाखर्चाचे अंदाजपत्रक बहुमताने मंजूर करण्यांत आलेले आहे. सन २००४-२००५ चे अंदाजपत्रका मध्ये मालमत्ता पुर्नमल्याकण खर्च या लेखा शिर्षकाखाली रक्कम रुपये दहा लाखाची तरतूद करण्यात आलेली आहे.

सन २००३-२००५ चे रिव्हीजन केलेल्या कर्मचा-यांना मानधन अदा करणे बाबत रिव्हीजन विभाग प्रमुखांनी प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर विषयी मालमत्ता पुनर्मल्यांकन खर्च या लेखाशिर्षातंर्गत रुपये १०,००,०००/- ची तरतूद करण्यांत आली आहे.

तसेच दि.२०/७/२००५ रोजी मा.सर्वसाधारण सभेमध्ये सदर विषयी मोबदला देणेबाबत चर्चा झालेली आहे. सदर कामाचा मोबदला रु.१४,९६,०००/- प्रस्तावित असून मुख्य लेखा परित्रकाच्या अभिप्रायास अनुसरुन तूर्त रु.१०,००,०००/- संबधीत कर्मचा-यांना अदा करणे योग्य .

यापूर्वी असे मानधन कर्मचा-यांना वितरण केले होत असे कार्यालयीन टिपणीत उल्लेख आहेत. त्याची त्यावेळचे ठराव व कोणते कामासाठी किती रक्कम दिल होती याची माहिती द्यावी.

सादर,

सन १९८९/९० मध्ये खालील प्रमाणे मेहताना दिलेला आहे ( रिव्हीजन कामासाठी)

१ ) रिव्हीजन ऑफिसर - रुपये ४०००/-
२ ) मदतनीस रुपये ४०००/-
३ ) असि.रिव्हीजन ऑफिसर रुपये ३०००/-
४ ) मदतनीस रुपये २५००/-
५ ) वसुली क्लॉर्क रुपये २५००/-
६ ) शिपाई रुपये १०००/-

सन १९९२-९३ मध्ये खालील प्रमाणे मेहनताना दिलेला आहे.

१ ) मुख्याधिकारी - रुपये ५५००/-
२ ) असि.रिव्हीजन ऑफिसर - रुपये ४५००/-
३ ) वसुली क्लार्क रुपये ३५००/-
४ ) मदतनीस शिपाई रुपये ३००/-

सन १९+९४-९५ मध्ये खालील प्रमाणे मेहनताना दिलेला आहे.

१ ) रिव्हीजन ऑफिसर रुपये ५५००/-
२ ) सहाय्यक रिव्हीजन ऑ. रुपये५०००/-
३ ) असि.रिव्ही.ऑफिसर रुपये ४५००/-
४ ) झोनल ऑफिसर रुपये ५०००/-
५ ) वसुली क्लॉर्क रुपये३५००/-
६ ) शिपाई / मदतनीस रुपये ३०००/-

सोबत नपा ठराव नं.३३ दि.५/५/९७ ची कॉपी

वरील कर्मचा-यांना रिव्हीजन कामी दिलेला मेहनतांना अवलोकनार्थ सादर.

रिव्हीजन २००३-२००४ मध्ये महसुली उत्पन्नात भरीव वाढ आली आहे. पंरतु या अतिरिक्त कर वाढीतून प्रत्यक्ष मनपास प्रत्यक्षात वसुलीवे उत्पन्न किती आले याची सविस्तर माहिती सादर करावी.

मा.आयुक्त साहेब यांचे आदेशानुसार वसूुली विभाग प्रमुख.

सन २००३-२००४ मध्ये झालेल्या रिव्हीजन मध्ये अतिरिक्त करवाढीतून मनपस पेत्यक्ष वसुलीचे उत्पन्न किती आले? याची सविस्तर माहिती मा.आयुक्तांना सादर करावी.

सादर,

सन २००३-२००४ या आर्थिक वर्षामध्ये रिव्हीजनचे काम झालेले असून सदर रिव्हजन
नुसार नवीन मिळकती पासून अतिरिक्त कर ( वसुलीचे उत्पन्न ) खालील प्रमाणे महानगरपालिकेस सन २००३-२००४ या वर्षी प्रत्यक्षात मिळालेले आहे.

| | | |
|---|---|---|
| १ ) | सावेडी वसुली विभाग | १,४३,०१,९७१/- |
| २ ) | शहर वसुली विभाग | ७६,९६,५५०/- |
| ३ ) | केडगांव उपकार्यालय | ६६,८७,८१५/- |
| ४ ) | नागापूर उपकार्यालय | १४,८२,१९३/- |
| ५ ) | बोल्हेगांव ---//----- | २,०३,७४३/- |
| ६ ) | बुरुडगांव ---//----- | १,९९,४०३/- |
| | एकूण | ३,५१,३५,९८६/- |

( तीन कोटी एक्कावन्न लाख पस्तीस हजार नऊशे शहाऐंशी फक्त )

उपरोक्त अहवाल सविनय फेरसादर,

कार्यालयीन प्रस्तावाचे अवलोकन केले प्रस्तावित केलेप्रमाणे अतिरिक्त कामाची मानधनदेणे यापूर्वीची पध्दत विचारांत घेता काही प्रमाणात देणेबाबत विचार होणेस हरकत वाटत नाही सध्याची मनपाची आर्थिक स्थिती विचारात घेता मनपाचे मंजूर बजेट मधून प्रस्तावित केलेली रक्कम देणे संयुक्तीक वाटत नाही. सबब सर्व प्रस्तावीत कर्मचारी + अधिकारी यांना एकूण रु.१० ( दहा ) लाख हे चालू आर्थिक वर्ष व पुढील आर्थिक वर्षात दोन टप्यामध्ये अदा करणेस मान्यता देणेस हरकत नाही.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर

अहमदनगर महानगरपालिकेचे सन २००३ - २००४ सालचे रिव्हीजनचे काम केलेल्या कर्मचा-याना कर्मचा-यांना मानधन अदा करणे बाबत विषयावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.श्री.गंधे मि.स.- श्री.वखारे,फुलसौंदर व श्री.मुदगल यांनी हि रिव्हीजनचे काम केलेले आहे.त्यांचा ही मानधन देणे विषयी विचार करण्यांत यावा.

मा.उपायुक्त ( सा ) - ज्या कर्मचा-यांना रिव्हीजन चे कामाची ऑर्डर आहे त्याना जादा कामाचा मोबदला देण्यांत येईल.

मा.श्री.कोतकर भा.ए.- किती कर्मचा-यांनी रिव्हीजन चे काम केलेले आहे.

मा.उपायुक्त साहेब ( कर ) - झोनल ऑफिसर १३ असि.रिव्हीजन ऑफिसर ९१,लिपिक ९५,व शिपाई ९४ तसेच उपायुक्त यांनी रिव्हीजनचे काम केलेल आहे.

ठराव - अहमदनगर महानगरपालिकेचे सन २००३ - २००४ सालचे रिव्हीजनचे काम केलेल्या कर्मचा-यांना मानधन अदा करणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

तसेच या कर्मचा-या व्यतिरिक्त ज्या इतर कर्मचा-यांनी रिव्हीजनचे जादा काम केले असल्यास व त्यांना मेहताना देणेचे चुकीने राहिले असल्यास रिव्हीजन विभागाने खात्री करुन घेऊन अशा कर्मचा-यांनाही मेहनतांना देणेत यावा.

नियमा नुसार कार्यवाही करावी.

सूचक -

अनुमोदक -

ठराव सर्वानुमते मंजूर.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

मा.स्थायी समिती सभा क्रमांक - १४ दिनांक २९-३-२००५.

विषय क्रमांक -४

स्थायी समिती ठराव क्रमांक -४ दिनांक -२९-३-२००५

**प्रस्तावाचा विषय** - अहमदनगर महानगरपालिकेचे नगर रचना योजना क्रमांक ४ ( अंतिम ) अंतिम भूखंड क्रमांक १२ मधील महालक्ष्मी उद्यान विकासीत करणेचे कामास व अंदाजे रक्कम रुपये २३,०९,३६४/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** - विनंती रिपोर्ट कि,एकत्मिक शहर विकास योजने अंतर्गत बालिकाश्रम रोड वरील एफ पी.नं.१२ टी.पी.आय. ४ येथील महालक्ष्मी उद्यान विकसीत करणेच्या कामास पूर्वी नगरपारिषद असतांना मा.सर्वसाधारण सभा ठराव नं. १२ दि.२८/२/२००० अन्वये प्रशाासकीय मान्यता देण्यात आली त्यानुसार सदर कामास तांत्रिक मान्यता घेवून जाहीर निविदा मागविण्यात आली होती. सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु.४१,५०,२०७/-४१,५०,२०७/- इतकी आहे.

तदनंतर आलेल्या निविदांचा तुलनात्मक तक्ता मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यांत आला त्यामध्ये सर्वात लोएस्ट असलेले मे.बेस्ट कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय रक्कमेच्या पेक्षा ९.९० टक्के चे जादा दराने काम करणेस मा.सर्वसाधारण सभा ठराव नं.२६ दि.१२/५/२००० अन्वये मंजूरी देण्यांत आली त्यानुसार सदर ठेकेदारास जा.क्र.सि.१९० दि.१५/७/२००० अन्वये कामाचे कार्यादेश देण्यांत आले.

सदर संस्थेस केलेल्या कामानुसार दि.३०/४/२००१ अखेर रु.३५,४०,१४०/- इतकी रक्कम अदा करण्यात आली.

अद्यापपर्यत झालेल्या कामामध्ये १.गोलाकृति कारंजाचे बांधकाम करणे.२.आयताकृति कारंजाचे बाधंकाम करणे.३.उतरती बैठक व्यवस्था (Sit out ) चे बांधकाम करणे.व त्यामध्ये मुरुमाचा भराव करणे.४.माळी हाऊस व कॅन्टीनचे छता पर्यतंचे बाधंकाम करणे.५.साठवण टाकीचे बांधकाम करणे.

इत्यादी कामाचा समावेश आहे.

सदर कामाकरिता आर्किटेक मे.आर्किव्हीस्टा कन्सलटंट अहमदनगर यांची नेमणुक करण्यांत आली होती .दि.३०/४/२००१ नंतर सदरचे काम बंद पडले होते. सदरचेकाम पूर्ण करणे बाबत प्रभाग क्र.११ मधील मा.नगरसेवक व विरोधी पक्ष नेते श्री.बहिरनाथ वाकळे मा.सभापती महीला व बाल कल्याण समिती डॉ.सौ.योगिता सत्रे व श्री.अनिल वसंत बोरुडे ,यांनी मागणी केली.व त्यानुसार मा.आयुक्त साहेब यांनी अपूर्ण असलेले काम सुरु करणे बाबत सुचना दिल्या.

महालक्ष्मी गार्डन विकसित करणे बाबत फेज - २ चे काम एकात्मिक शहर विकास योजने मध्ये असून सदर कामाच्या आराखडयास मा.उपसंचालक नगर रचना विभााग,नाशिक

यांची जा.क्र.२०८५ दि.२/११/०४ अन्वये मंजूरी प्राप्त झाली सदरच्या कामा करिता मनपा महानगरपालिकसा आर्किटेक पॅनलचे मे.अजय ठाकूर ,औरंगाबाद यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

महालक्ष्मी उद्यान विकसीत करणेच्या फेज - २ च्या कामात खालील प्रमाणे कामांचा समावेश आहे.

१ ) गोल कारंजाचे प्लंबींग ,पॅनल बोर्ड बसविणे लाईट फिटींग बसविणे,सबमर्सिबल पंप बसविणे व प्रेशर कंट्रोल व्हॉल बसविणे.

२ ) प्ले- इक्वपमेंट ( खेळणी ) बसविणे.

३ ) आयता कृती कारंजामध्ये प्लंबीग करणे बबलर आकृतीचे फाऊंटन नोजल व प्रेशर कंट्रोल व्हॉल बसविणे.सबमसिबल पंप बसविणे जॅक्शन बॉक्स बसविणे रोटेटींग फिंगर जेट प्रेशर व्हॉल बसविणे कंन्टोल पॅनल बसविणे इ.कामांचा समावेश आहे.

४ ) पेव्हींग करणे - ड्रिकींग वॉटर बुथ चे बांधकाम करणे.

५ ) ज्येष्ठ नागरीकां करिता बैठकीची व्यवस्था करणे.

६ ) विद्युतीकरण करणे.

७ ) विविध कलाकृतीचे पुतळे बसविणे करिता आवश्यक त बांधकाम करणे.

८ ) प्लेस स्कल्पचर बसविणे करिता आवश्यक ते बांधकाम करणे.

९ ) फलॉवर बेड तयार करणे .लॅण्ड स्केपिंग करणे.

इत्यादी कामांचा समावेश करणे.

पुर्वीच्या प्रस्तावानुसार आयताकृतीचे तीन कारंजाचे बांधकाम करण्यात आलेले आहे.मा.आयुक्त यांचेशी झालेल्या चर्चेनुसर तीन आयताकृती कारंजाचे ऐवजी सध्याएकच कारंजा विकसीत करणे व उर्वरीत दोन आयताकृती कारंजामध्ये फलॉवर बेड करणे व लोटस पाँड करणे बाबतचे नियोजन आहे. माळी हाऊस व कॅन्टीनचे ऐवजी मत्स्यालय करण्याचे नियोजन आहे.

महालक्ष्मी उद्यान विकसीत करणे फेज - २ चे सवीस्तर अंदाजपत्रक रक्कम रु.२३,०९,३६४/-इतके आहे. सदरचा प्रकल्प एकात्मिक शहर विकास योजनेअंतर्गत असल्यामुळे त्यास ३३ टक्के अनुदान ( रक्कम ७,६२,०९०/- शासनाकडून प्राप्त होणार आहे. उर्वरीत रक्कम रु.१५,४७,२७४/- ची रक्कम मनपा फंडातून खर्च करावी लागेल.

तरी सदरच्या कामास व खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेस्तव ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

अहमदनगर महानगरपालिकेचे नगर रचना योजना क्रमांक ४ ( अंतिम ) भूखंड क्रमांक १२ मधील महालक्ष्मी उद्यान विकसीत करणेचे कामास व अंदाजे रक्कम रुपये २३,०९,३६४/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबतचे विषयावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री.जाधव कृ.द.- पूर्वीच्या कामाची परिस्थिती काय आहे. सिटी इंजि.- पूर्वीच्या कामाचे एस्टीमेट रुपये ४१,५०,२०७/- चे होते त्या पैकी बेस्ट कंन्स्ट्रक्शन यांना रुपये ३५,४०,१४०/- चे पेमेंट अदा केलेले आहे. उर्वरीत रक्कम शिल्लक आहे.

मा.श्री.जाधव कृ.द.- बागेची पहाणी केली असता जागेवर ३५ लाखाचे काम झाल्याचे दिसत नाही. कामाचे टेंडर मध्ये जी कामे होती ती पूर्ण झाली आहेत का? याची खात्री करावी.

मा.उपायुक्त (सा ) पूर्वी जी काम` झालेली आहे. त्याची तपासणी करण्यांत येईल. व्हॅल्यएशन करुन घेऊ.

मा.श्री.चव्हाण दि.ना.- हा विषय कसा आला ऑफिस रिपोर्ट परिपूर्ण नाही.

श्री.मेहत्रे इंजि.- विरोधी पक्ष नेते मा.श्री.बहिरनाथ वाकळे,मा.सभापती महीला व बालकल्याण समिती डॉ.सौ.योगिता सत्रे व मा श्री.बोरुडे अ.व.यांनी तोंडी मागणी व त्या नुसार मा.आयुक्त साहेब यांचे सूचने नुसार व आय डी एस एम टी चे अनुदान आलेले असल्याने रिपोर्ट तयार केलेला आहे.

मा.श्री.चव्हाण दि.ना.- पूर्वी झालेल्या कामाची चौकशी करावी अपूर्ण करुन घ्यावीत टेंडर प्रमाणे काम झाले नाही तर नविन कामात त्यांचे टेंडर स्विकारु नयेत.

श्री.मेहत्रे इंजि.- अद्यापी पाण्याची टाकी इत्यादी दहा लाखाची कामे होणे बाकी आहेत.

मा.श्री.जाधव कृ.द,व मा.श्री.चव्हाण दि.ना - सदर कामा बाबत पूर्वी कुणी तक्रारी केल्या आहेत.

मा.सभापती साहेब - त्यांचे कडून कामे पूर्ण करुन घ्यावीत झालेल्या कामा बाबत शहर अभियंता यांनी अहवाल यावा.

मा.श्री.कोतकर भा.ए. - क्वालिटी कंन्ट्रोल कडून झालेले काम योग्य कि अयोग्य याची चौकशी करावी.

मा.सभापती साहेब - मा.स्थायी समितीचे पांच सदस्यांची कमेटी झालेल्या चौकशी कामी नेमण्यांत येईल.

**ठराव** - अहमदनगर महानग रपालिकेचे नगर रचना योजना क्र.४(अंतिम ) अंतिम भूखंड क्र.१२ मधील महालक्ष्मी उद्यान विकसीत करणेचे फेज दोनचे कामास व अंदाजे रक्कम रुपये २३,०९,३६४/- ( रुपये तेवीस लाख नऊ हजार तीनशे चौसष्ट फक्त ) चे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

मात्र पूर्वीचे ठेकेदार बेस्ट कंन्स्ट्रक्शन यांचे कडून राहिलेली कामे पूर्ण करुन घेण्यांत यावीत.

तसेच झालेल्या कामाचे चौकशी कामी स्थायी समिती सदस्य मा.श्री.

मा.श्री.

यांची कमेटी नेमण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.सदर कमेटीने केलेल्या अहवाला प्रमाणे पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

नियमा नुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक -

अनुमोदक -

ठराव सर्वानुमते मंजूर.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

मा.स्थायी समिती सभा क्रमांक - १४ दिनांक २९-३-२००५.

---

विषय क्रमांक -५

स्थायी समिती ठराव क्रमांक -५ दिनांक -२९-३-२००५

**प्रस्तावाचा विषय** -अहमदनगर महानगरपालिकेचे नगर रचना योजना क्रमांक ४ अंतिम भूखंड क्रमांक १२(अ )मधील सावित्रीबाई फुले व्यापारी संकुलाचे दुस-या टप्प्यातील बांधकामाचे रक्कम रु.८४,२९,१६७/- चे खर्चाचे अंदाजपत्रकास व सदर कामी खुल्या पध्दतीने निविदा मागवून काम करुन घेण्यांस प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर-** एकात्मिक शहर विकास योजना नगर रचना योजना क्र४अं.भू.क्र.१२(अ ) मधील व्यापारी संकुलाचे दुस-या टप्प्यातील बांधकामाच्या अंदाजपत्रकास प्रशाासकीय मान्यता मिळणे बाबत.

संदर्भ - १ ) अहमदनगर नगरपरिषद ठराव नं.१९ दि.५/७/२००२

२ ) मा.आयुक्त महानगरपालिका यांचे पत्र नगर रचनाकार विभाग क्र.८४४ दि.३/६/०४ .

३ ) मा.उपसंचालक नगर रचना नाशिक विभाग यांचे पत्र क्र.क ना वि / ए श वि यो अ.नगर/घटक । (१ ) नकाशे मंजूरी /१३५दि.१५/१/२००४.

४ ) मा.सहसंचालक नगर रचनाकार विभाग यांचे पत्र क्र.जे डी टी पी / ई ई /आय/ डब्लू/टी एस /अहमदनगर /एफ पानं.१२८ /ई एक्स टी.एस.सी./१८०/दि.१/३/२००५.

उपरोक्त विषयान्वये अहवालज सादर करण्यात येतो कि नगर रचना योजना क्र.४ भू.क्र.१२८ ( अ ) सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल बांधणे बाबतच्या प्रकल्पास तत्कालीन नगरपरिषद ठराव क्र.१९ दिनांक ५/७/२००२ अन्वये एकात्मिक शहर योजना अंतर्गत रु.१२०.८९ लक्ष रकमूचे अंदाज पत्रकास शासनाकडे सादर करण्यासाठी मान्यता देण्यात आली त्या नुसार मा.कार्यकारी अभ्यिंता ,अमंल बजावणी कक्ष ,नगर रचना पुणे यांचे कडे तांत्रिक मान्यतेसाठी सादर करण्यात आले, त्या नुसार सहसंचालक,नगर रचना, महाराष्ट्र राज्य पुणे यांनी उपरोक्त संदर्भिय पत्र क्र.अन्वये रु.८४,२९,१६७/- च्या अंदाज पत्रकास तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे.

सदर अंदाज पत्रकीय रकमे पैकी नियमा प्रमाणे ३३% अनुदान म्हणजे रु.२७,८१,६२५/- रक्कम केंद्र शासना कडून एकात्मिक शहर विकास योजना अतंर्गत प्राप्त होणार व ६७ % टक्के म्हणजे रु.५६,४७,५४२/- ही म.न.पा.फंडातून खर्च करावी लागणार आहे. तरी रु.८४,२९,१६७/- रकमेच्या अंदाज पत्रकास प्रशासकीय मान्यता व खुल्या पध्दतीने निविदा मागवून काम करुन घेणेस मान्यता मिळावी.

सबब प्रकरण मा. स्थायी समिती पुढे सादर.

अहमदनगर महानगरपालिकेचे नगररचना योजना क्र.४ अंतिम भूखंड क्रमांक १२८ मधील सावित्रीबाई फुले व्यापारी संकुलाचे दुस-या टप्प्यातील बांधकामाचे रक्कम रुपये ८४,२९,१६७/- चे खर्चाचे अंदाज पत्रकास व सदर कामी खुल्या पध्दतीने मंजूरी मिळणे बाबतचे विषया वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.उपायुक्त साहेब - सदरचा विषय हा आय डी एस एम टी अंतर्गत असून खर्चास व निविदा काढाणेस मंजूरी मिळणे करीता सभे पुढे ठेवलेला आहे.

मा.श्री.गंधे मि.स.- ठिक आहे.

ठराव - अहमदनगर महानगरपालिकेचे नगर रचना योजना क्रमांक ४ अंतिम भूखंड क्रं.१२८मधील सावित्रीबाई फुले व्यापारी संकुलाचे दुस-या टप्प्यातील बांधकामास व रक्कम रुपये ८४,२९,१६७/- (रुपये चौ-यााऐंशी लाख एकोणतीस हजार एकशे सदुसष्ठ फक्त ) चे खर्चाचे अंदाज पत्रकास तसेच सदर कामी खुल्या पध्दतीने जाहिर निविदा मागविण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर

नियमा नुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सूचक -

अनुमोदक -

ठराव सर्वानुमते मंजूर.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

मा.स्थायी समिती सभा क्रमांक - १४ दिनांक २९-३-२००५.

---

विषय क्रमांक -६

स्थायी समिती ठराव क्रमांक - ६ दिनांक -२९-३-२००५

प्रस्तावाचा विषय -अहमदनगर महानगरपालिकेचे सि.स.नं.२४९ मंगलगेट येथील मटण मार्केट उभारणेचे कामाचे रक्कम रुपये २३,३७,९७८/- चे खर्चाचे अंदाज पत्रकास व सदर कामी खुल्या पध्दतीने निविदा मागवून काम करुन घेण्यांस प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर -** एकात्मिक शहर विकास योजनेतील घटकांची अमंल बजावणी करणे बाबत सि.स.नं. २४९ मंगळ गेट येथे मटन मार्केट उभारणे बाबत.

संदर्भ - १ ) अहमदनगर महानगरपालिका / जी.क्र./टी पी ५११३ दि.२२/२/२००५ चे पत्र

२ उपसंचालक नगर रचना,आणि मुख्य निर्धारण विभाग /नाशिक जा.क्र.नावि/एशवियो/अ.नगर /घटक क्र( २ )नकाशे मंजूरी /१३४ ना.रोड दिनांक १५/१/०४ .

३ ) मा.कार्यकारी अभियंता ,अमंल बजावणी कक्ष - नगर रचना ३ ते जा.क्र.(३ ) अ /अक/नर/पुणे/तांश/९९ दि.७/२/२००५

वरील विषया बाबत सि.स.नं. मंगळगेट येथे मटन मार्केट उभारणे बाबतचे प्रकल्पास तत्कालीन नगर परिषद ठ.क्र.१९ दिनांक ५/७/२००२ अन्वये एकात्किम शहर योजना अंतर्गत कार्यवाही करणे बाबतचा ठराव मंजूरी नंतर मा.उपसचालक नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग नाशिक यांनी संदर्भीय पत्र क्र.२ अन्वये नकाशेस मान्यता दिलेली असून मा.कार्यकारी अभियंता अंमल बजावणी कक्ष नगर रचना पुणे यांनी सदर कामाचे अंदाज पत्रक रक्कम रु.२३,३७,७८/- मान्यता संदर्भ पत्र (३ ) अन्वये प्राप्त झालेला आहे.

सदर अंदाज पत्रका पैकी नियमाप्रमाणे ३३% अनुदान म्हणजे ७,७१,५३३/-* ही रक्कम केंद्र शासन ( एकात्मिक शहर विकास योजना ) प्राप्त झालेले असून उर्वरीत रक्कम ६७% म्हणजे १५,६६,४४५/- मनपा फंडातून खर्च करावी लागेल,तरी सदरी कामाचे टेंडर मागवून येणा-या खर्चास पुढील कार्यवाही करणे बाबत ओदशार्थ सादर

उपरोक्त कामाव तत्कालीन नगरपरिषद ठराव क्र १९ दि.५/७/२००२ अन्वये एकात्मिक शहर योजना अंतर्गत ठराव पारीत झालेला आहे. पंरतु नगरपालिकेचे महानगरपालिकेत रुपांतर झालेने नविन प्रशासकीय मान्यता मिळणेस व निविदा काढणेस मान्यता मिळावी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

अहमदनगर महानगर पालिकेचे सि.स.नं.२४९ मंगलगेट येथील मटण मार्केट उभारणेचे कामाचे रक्कम रुपये २३,३७,९७८/- चे खर्चाचे अंदाज पत्रकास व सदर कामी खुल्या पध्दतीने निविदा मागवून काम करुन घेण्यांस प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत चे विषयावर सभे मध्ये झालेली चर्चा.

ठराव - अहमदनगर महानगरपालिकेचे सि.स.नं.२४९ मंगल गेट येथील मटण मार्केट उभारणेचे कामास व रक्कम रुपये २३,३७,९७८/- ( रुपये तेवीस लाख सदवतीस हजार नऊशे अठठयाहत्तर फक्त ) चे खर्चाचे अंदाज पत्रकास तसेच सदर कामी खुल्या पध्दतीने जाहिर निवीदा मागविण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर.

नियमा नुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक -

अनुमोदक -

ठराव सर्वानुमते मंजूर.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

मा.स्थायी समिती सभा क्रमांक - १४ दिनांक २९-३-२००५.

---

विषय क्रमांक -७

स्थायी समिती ठराव क्रमांक - ७ दिनांक -२९-३-२००५

**प्रस्तावाचा विषय** -अहमदनगर महानगरपालिकेचे सि.स.नं.१०४० बेलदार गल्ली येथे व्यापारी संकुल उभारणेचे कामाचे रक्कम रुपये २९,०३,०५१/- चे खर्चाचे अंदाज पत्रकास व सदर कामी खुल्या पध्दतीने निविदा मागवून काम करुन घेण्यांस प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** -एकात्मिक शहर विकास योजनेतील घटकांची अमंलज बजावणी करणे बाबत सि.स.नं.१०४० बेलदार गल्ली येथे व्यापारी संकुल उभारणे बाबत.

संदर्भ - १ ) अहमदनगर महानपगरपालिका /जा.क्र.टि.पी.५११३दि.२५/५/२००४ चे पत्र

२ ) महा संचालक नगर रचना पुणे यांचे पत्र क्र डी.टी.पी.ई ई /डब्लू /टीएस /अ.नगर/१०४०/०२ दि.३/२/०५.

वरील विषया बाबत सि.सं.नं. १०४० बेलदार गल्ली येथे व्यापारीसंकुल उभारणे बाबतचे या प्रकल्पास तत्कलिन नगरपारिष्द ठ.क्र.१९ दि.५/७/२००२ अन्वये एकात्मिक शहर योजना अंतर्गत कार्यवाही करणे बाबतचा ठराव मंजूरी नंतर मा.सहसंचालक नगर रचना पूणे यांचे पत्र क्र. आय.डी.टी.पी.ई ई डब्लू /टीएस अहमदनगर १०४०/०२ दि.३/२/२००५ चे पत्र दि.३/२/२००५ अन्वये अंदाज पत्रक व नकाशे मंजूरी मान्यता प्राप्त झालेली असून सदर कामाचे अंदाज पत्रक रक्कम रु.२९,०३,०५१/- मान्यता प्राप्त झालेले आहे.

सदर अंदाज पत्रका पैकी नियमा प्रमाणे ३३% अनुदान म्हणजे रु.९,५८,००७/- ही रक्कम केंद्र शासन ( एकात्मिक शहर विकास योजना ) प्राप्त झालेले असून उर्वरीत रक्कम ६७% म्हणजे १९,४५,०४४/- मनपा फंडातून खर्च करावी लागेल ,तरी सदर कामाचे टेंडर मागवून येणा-या खर्चास पुढील कार्यवाही करणे बाबत आदेशार्थ सादर.

उपरोक्त कामास तत्कालीन नगरपारिष्द ठराव क्र१९ दि.५/७/२००२ अन्वये एकात्मिक शहर योजना अंतर्गत कार्यवाही करणेचा ठराव मंजूर झाला होता.पंरतु नगरपालिकेचे महानगरपालिकेत रुपांतर झालेने नविन प्रशासकीय मान्यता मिळणेस व निविदा काढणेस मान्यता मिळावी .

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

अहमदनगर महानगरपालिकेचे सि.स.नं.१०४० बेलदार गल्ली येथे व्यापारी संकुल उभारणेचे कामाचे रक्कम रु.२,९३,०५१/- चे खर्चाचे अंदाज पत्रकास व सदर कामी खुल्या पध्दतीने निविदा मागवून काम करुन घेण्यांस प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबतचे विषयावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.श्री.जाधव कृ.द.- सदरचे काम दोन तीन वेळा सुरु करण्याचा प्रयत्न झालेला आहे. पंरतु तेथील नागरीकांनी त्यास विरोध केलेला असल्याने काम होऊ शकले नाही.
मा.सभापती साहेब - अशा वेळेस पोलिस बंदोबस्त घेवून काम करण्यांत यावे.
मा.श्री.जाधव कृ.द. - तेथील नागरिकांचे म्हणजे आहे कि,सदर शॉपिंग सेंटर चे जागी समाजा साठी हॉलचें ( समाज मंदीर ) बांधकाम असावे त` शॉपिंग सेंटर वरील मजल्यास करता येईल.
मा.उपायुक्त साहेब - (सा) सदर जागी शॉपिंग सेंटरचे रिझर्व्हेशन आहे.

ठराव - अहमदनगर महानगरपालिकेचे सि.स. नं.१०४० बेलदार गल्ली येथे व्यापारी संकूल उभारणेचे कामास व रक्कम रु.२९,०३,०५१/- ( रुपये एकोण तीस लाख तीन हजार एक्कावन्न फक्त ) चे खर्चाचे अंदाज पत्रकास तसेच सदर कामी खुल्या पध्दतीने जाहिर निविदा मागविण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर.

नियमा नुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी

सूचक -

अनुमोदक -

ठराव सर्वानुमते मंजूर.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

मा.स्थायी समिती सभा क्रमांक - १४ दिनांक २९-३-२००५.

विषय क्रमांक - ८
स्थायी समिती ठराव क्रमांक - ८ दिनांक -२९-३-२००५
प्रस्तावाचा विषय- अहमदनगर महानगरपालिकेचे आगरकर मळा व स्टेशन रोड परिसरातील नळ पाणी पुरवठा योजनेचे वितरण व्यवस्थेची उंच टाकी ते शिवनेरी चौक व पुढे ४०० एम.एम. व्यासाची कास्ट आयर्न पाईप लाईन टाकणेचे कामास व अंदाजे रुपये २५,७२,१००/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

अहमदनगर महानगरपालिकेचे आगरकर मळा व स्टेशन रोड परिसरातील नळ पाणी पुरवठा योजनेचे विरणर व्यवस्थेची उंच टाकी ते शिवनेरी चौक पुढे ४०० एम एम व्यासाची कास्ट आयर्न पाईप लाईन टाकणेचे कामास व अंदाजे रुपये २,५७,२१००/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत विषयावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री.गंधे मि.स. - सदर टाकीचे बांधकाम पूर्ण झाले आहे काय?
शहर अभियंता - होय झालेले आहे.
मा.श्री.चव्हाण दि.ना. - किती इंची लाईन टाकणे आहे. शहर अभियंता - टाकी मधून करावयाच्या पाण्याचे वितरणा साठी सदरची ४०० मी.मी.पाईप लाईन टाकणे आहे.
मा.श्री. जाधव कृ.द. - सध्या उन्हाळयाचे दिवस असल्याने पाणी पुरवठया संबंधाची कामे लवकरात लवकर करुन घ्यावीत.

ठराव - अहमदनगर महानगरपालिकेचे आगरकर मळा व स्टेशन रोड परिसरातील नळ पाणी पुरवठा योजनेचे विरतण व्यवस्थेची उंच टाकी ते शिवनेरी चौक व पुढे ४० मी.मी. व्यासाची कास्ट आयर्न पाईप लाईन टाकणेचे कामास व अंदाजे रुपये २,२५,७२१००/- ( रुपये पंचवीस लाख बहाहत्तर हजार शंभर फक्त ) चे खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर.

नियमा नुसार पुढील कार्यवाही करावी
सुचक -
अनुमोदक -

ठराव सर्वानुमते मंजूर.